ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३१ पुणें, बुधवार १९ मे, १९६५ अंक १०

## विविध माहिती

**कच्छमधील चकमकींचा दूरदर्शनपट**—भारत आणि पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान गेल्या महिन्यांत कच्छच्या रणांत मोठ्या प्रमाणावर चकमकी झाल्या. ह्या चकमकींचा व लष्करी हालचालींचा दूरदर्शनपट घेण्यांत आला असून तो अमेरिकेंतील दूरदर्शन केंद्रावरून प्रक्षेपित करण्यांत आला. चित्रपटाचें प्रक्षेपण करण्यासाठी अमेरिकेनें अंतराळांत सोडलेल्या उपग्रहांतील उपकरणांचा उपयोग करण्यांत आला. हा उपग्रह अटलांटिक सागरावर कायम कक्षेंत भ्रमण करीत आहे. दूरदर्शनपटाचें चित्रीकरण रणाच्या भारतामधील बाजूनें करण्यांत आलें.

**यांत्रिक हत्यारांची निर्यात**—हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या भारत सरकारच्या मालकीच्या कारखान्यानें पोलंडला यांत्रिक हत्यारें निर्यात करण्याचा करार केला आहे. करारांत ठरल्याप्रमाणें पोलंड भारताकडून २० लाख रुपयांचीं यांत्रिक हत्यारें आयात करील. पोलंडकडून भारतामधील यांत्रिक मालाची मोठ्या प्रमाणावर आयात होण्याची ही पहिलीच वेळ आहे. पोलंड आणखीहि आयात करण्याचा संभव आहे. कारखान्यानें पश्चिम जर्मनी व स्वित्झरलंड ह्या देशांनाहि यांत्रिक हत्यारांची निर्यात केलेली आहे.

**कच्छच्या रणाचा विकास**—चौथ्या पंचवार्षिक योजनेंत कच्छच्या रणांतील नापीक जमीन सुपीक करण्याची आणि रणांत येणाऱ्या समुद्राच्या भरतीचा विजेच्या निर्मितीसाठी उपयोग करून घेण्याची एक योजना तयार करण्यांत येत आहे. ह्या कामीं उच्च तंत्रज्ञांचें साह्य घेण्यांत येत आहे. कच्छच्या आखातांमधील कांहीं ठिकाणीं भरतीच्या लाटांनीं पाण्याची पातळी ४० फुटांपर्यंत वाढते. त्याचा वीजनिर्मितीसाठी उपयोग होऊं शकेल.

**चीन-रशिआ व्यापारी करार**—चीन व रशिआ ह्यांनीं १९६५ सालापुरता एक व्यापारी करार केला आहे. रशिआनें चीनला यांत्रिक हत्यारें, विमानें, मोटारी, ट्रॅक्टर्स, शेतीचीं अवजारें, रसायनें, इत्यादि माल पुरवावयाचा असून फळें, डुकराचें मांस, तूट, दुधाचे पदार्थ, रेशमी कापड, इत्यादि माल चीनकडून घ्यावयाचा आहे.

**वंगणाच्या तेलाचा कारखाना**—मुंबई येथें वंगणाच्या तेलाचा कारखाना काढण्याची परवानगी भारत सरकारनें एसो कंपनीला दिली आहे. त्याची उत्पादनक्षमता १ लाख, ४५ हजार टन असेल. कारखान्याच्या उभारणीसाठी ७ कोटी रुपये लागणार आहेत. त्यांपैकीं ५० ते ६० टक्के खर्च परदेशीय चलनांतील असेल.

**कोचीनचा तेलशुद्धीचा कारखाना**—कोचीन येथें उभारण्यांत येत असलेला तेलशुद्धीचा कारखाना १९६५ अखेर पूर्ण करण्यांत येईल असा अंदाज आहे. उभारणीबाबतच्या कराराप्रमाणें हें काम ऑक्टोबर १९६५ पर्यंत पूर्ण करावयाचें आहे. मद्रासजवळ काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्याची उभारणी १९६७ च्या मध्याच्या सुमारास पूर्ण होईल. १९६८ मध्यें हा कारखाना आपली संपूर्ण उत्पादनक्षमता कारणी लावील.

**तीर्थक्षेत्राच्या विकासाचें काम**—श्रवणबेळगोळा ह्या म्हैसूर राज्यांतील जैनांच्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्राचा विकास करण्याच्या कामास प्रारंभ झाला आहे. विकासाचें काम करतांनां हौशी प्रवाशांची सोय करण्याकडेहि लक्ष देण्यांत येणार आहे. तीन टप्प्यांत पूर्ण होणाऱ्या ह्या विकास योजनेसाठी ५९·५० लक्ष रुपये खर्च येणार आहे. पहिल्या टप्प्यासाठी १४·१० लक्ष रुपये खर्च होणार आहेत.

**अवशेषांच्या जतनासाठी मदत**—इजिप्तमधील आस्वानचें धरणें पुरें झाल्यावर प्राचीन इजिप्तच्या संस्कृतीचे खडकांत खोदलेले अवशेष पाण्याखालीं जाणार आहेत. ते वांचविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेची सांस्कृतिक शाखा काम करीत आहे. भारत सरकारनें संघटनेला २८ लाख रुपयांची मदत देऊं केली आहे. इजिप्तमधील प्राचीन शिल्पकलेचे हे अवशेष ३ हजार वर्षांपूर्वीचे आहेत.

**मॉस्कोंत हिंदी बोलपट**—श्री. हृषीकेश मुकर्जी ह्यांनीं दिग्दर्शित केलेला 'अनुराधा' हा बोलपट मॉस्को येथील ४६ चित्रगृहांतून एकाच वेळीं दाखविण्यांत येत आहे. मॉस्कोखेरीज इतर घटक राज्यांतील चित्रगृहांतूनहि तो दाखविण्यांत येत आहे. बोलपटाला रशिअन भाषेंतील संवादाची जोड देण्यांत आली आहे. प्रेक्षकांनीं त्याचें चांगलें स्वागत केलें.

**माती हलविण्याची यंत्रसामग्री**—इंडिअन एंजिनिअरिंग अँड कमर्शिअल कॉर्पोरेशन ह्या कंपनीनें रशिआशीं करार करून महाराष्ट्र सरकारला माती हलविण्याची यंत्रसामग्री पुरविण्याचें काम अंगावर घेतलें आहे. ह्या कंपनीनें महाराष्ट्र सरकारला आतांपर्यंत ४५ लाख रुपये किमतीचीं यांत्रिक अवजारें पुरविलीं आहेत. नवीन कराराप्रमाणें मिळणारी यंत्रसामग्री १९६५ अखेर प्रत्यक्ष हातीं पडेल.

**तिरुपती येथें निसर्गोपचार केंद्र**—आंध्र प्रदेशांतील सर्वोदयी पुढारी श्री. प्रभाकरजी ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं तिरुपती ह्या ठिकाणीं निसर्गोपचार करण्याचें एक खास केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. केंद्राच्या स्थापनेसाठी सुमारें ५ लाख रुपये लागतील असा अंदाज आहे.

**सरकारी शेती कॉर्पोरेशन**—महाराष्ट्र राज्याच्या स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशननें महाराष्ट्र शुगर मिल्स ह्या खाजगी साखर कारखान्याची १४ हजार एकर जर्मीन कमाल जमीन धारण कायद्याप्रमाणें आपल्या ताब्यांत घेतली. त्यापैकी ४ हजार एकर जमिनींत उसाचें उभें पीक होतें. आतांपर्यंत कॉर्पोरेशननें खाजगी साखर कारखान्यांकडून एकूण ५० हजार एकर जमीन आपल्या ताब्यांत घेतली आहे.

**रशिआला होणारी पादत्राणांची निर्यात**—भारताकडून रशिआला होणाऱ्या पादत्राणांच्या निर्यातींत कांहीं वर्षांनीं घट होण्याचा संभव आहे. कारण, पाकिस्तान रशिआला हा माल पाठविण्याची जोराची खटपट करीत आहे. पाकिस्ताननें आपल्या मालाचे नमुने रशिआला पाठविले असून किंमती भारताच्या मालापेक्षा कमी सांगितल्या आहेत. त्यामुळें भारताला पाकिस्तानच्या मालाशीं स्पर्धा करावी लागेल.

**भारताची अंड्यांची गरज**—आहारशास्त्रांतील तज्ज्ञांच्या मतानें हिंदी लोकांचा आहार समतोल राखावयाचा झाल्यास प्रत्येक माणसाला रोज एक अंडें तरी मिळालें पाहिजे. १९७६ च्या सुमारास ५० टक्के लोकांना रोज एक अंडें द्यावयाचें म्हटलें तरी दरसाल १० हजार कोटी अंड्यांचें उत्पादन करावें लागेल, आणि कोंबड्यांची संख्या ९० कोटीपर्यंत वाढवावी लागेल.

**एंजिनिअरिंगच्या मालाची निर्यात**—भारताकडून इराणला करण्यांत येणाऱ्या एंजिनिअरिंगच्या मालांत गेल्या वर्षांत समाधानकारक वाढ झाली आहे. १९६३ सालीं भारतानें ३९·६८ लाख रुपये किमतीचा माल निर्यात केला होता. १९६४ सालीं ९४·८४ लाख रुपये किमतीचा माल निर्यात करण्यांत आला. टक्केवारीच्या भाषेंत ही वाढ २५० टक्के आहे.

**जपानचा राष्ट्रीय आरोग्यदिन**—टोकिओमध्यें झालेल्या ऑलिंपिक जागतिक सामन्यांत जपानी स्पर्धक मागें पडले. त्यामुळें जपानमधील लोकांचें व सरकारचें लक्ष नागरिकांच्या आरोग्याकडे वेचलें गेलें आहे. हा आरोग्यदिन दरमहा पाळण्यांत येणार आहे. मेमधील मासिक आरोग्यदिनाच्या दिवशीं जपानच्या ५ मंत्र्यांनीं ८०० लोकांसह २॥ मैलांची भ्रमंती केली.

**सरकारी मालकीचा कागदाचा कारखाना**—भारत सरकारनें कागद तयार करण्याचा एक नवा कारखाना सार्वजनिक विभागांत स्थापन करण्याचें ठरविलें आहे. देशांत कागदाचा तुटवडा असून खाजगी मालकीच्या विभागांतील कारखान्यांकडून सर्व गरज भागवितां येण्यासारखी परिस्थिति नाहीं. त्यामुळें नवा कागद कारखाना काढण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागला.

**काळ्या पैशानें अधिक व्यवहार**—स्टेट बँक ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. देहजिआ सुरत चेंबर ऑफ कॉमर्सनें केलेल्या स्वागत प्रसंगीं म्हणाले कीं, व्यापार आणि उद्योगधंदे ह्या क्षेत्रांत हिशेबांत दाखविलेल्या पैशापेक्षा काळ्या पैशाच्या साह्यानें अधिक व्यवहार होत असण्याचा संभव आहे. परंतु प्रामाणिकपणें व्यवहार करणारांना त्यामुळें तोशीस पडते. हें असें चालूं देणें योग्य नाहीं.

**रॉकेल व डिझेल तेलाची आयात**—भारतांत आयात करण्यांत येणारें रॉकेल आणि डिझेल तेल ह्यांची आयात गेल्या महिन्यापासून सरकारी मालकीच्या इंडियन ऑईल कंपनीमार्फत चालूं झाली आहे. पेट्रोलजन्य पदार्थांच्या आयातीसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनांत बचत करणासाठी ही व्यवस्था करण्यांत आली आहे. इंडियन ऑईल कंपनी तेलाची किंमत रुपयांत देते.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

" चिरमुले निकेतन ", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८-२-६५ पासून ठेवींवरील व्याजाचे दरांत खालीलप्रमाणें वाढ झालेली आहे.*

### मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शें. | ६=२५ |
| २ वर्षें | ” | ६=५० |
| ३ वर्षें | ” | ६=७५ |
| ५ वर्षें | ” | ७=२५ |
| ७ वर्षें | ” | ७=५० |
| ९ वर्षें व जास्त | ” | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खातें :—दि. १-२-६५ पासून ४ टक्के

*तसेंच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याहि शाखेंत अधिक माहिती मिळूं शकेल.



*इकडे लक्ष द्या :*

## ठेवींवरील व्याजाचे दर वाढले !

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| ९१ दिवस | ५¼% ( सव्वापाच ) |
| ६ महिने | ५½% ( साडेपाच ) |
| ९ ते ११ महिने | ५¾% ( पावणेसहा ) |
| १ वर्ष | ६¼% ( सव्वासहा ) |
| २ वर्षें | ६½% ( साडेसहा ) |
| ३ आणि ४ वर्षें | ७ % ( सात ) |
| ५ आणि ६ वर्षें | ७½% ( साडेसात ) |
| सेव्हिंग बँक खात्यावर | ४ % ( चार ) |

*अधिक बचत करा आणि बचतीवर अधिक व्याज मिळवा*

म्हैसूर, महाराष्ट्र आणि गोवा येथील ३८ शाखांपैकी कोणत्याहि शाखेंत चौकशी करा

## बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

रजिस्टर्ड ऑफिस : बेळगांव.

# अर्थ

बुधवार, १९ मे, १९६५



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## विकसनशील अर्थव्यवस्था आणि लोकसंख्या

आशिया खंडांतील देशांपुढें झपाट्यानें वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रश्नामुळें अनेक अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न जपानलाहि भेडसावीत होता. परंतु सतत विकास पावत जाणाऱ्या अर्थव्यवस्थेंत हा प्रश्न सुटूं शकतो, निदान त्याची तीव्रता कमी होते, असें जपानच्या उदाहरणावरून दिसून येतें. गेल्या दहा वर्षांत जपानची औद्योगिक प्रगति वेगानें होत गेली. त्यामुळें तेथें आज काम करणाऱ्या माणसांचा तुटवडाच भासत आहे. जपानमध्यें बेकारी आणि अर्धबेकारी ह्यांचा वारसा तसा जुना आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत जपानच्या शस्त्रास्त्रांच्या कारखान्यात लाखों लोकांना रोजगार मिळाला, पण १९४५ सालीं युद्ध थांबल्यावर बेकारांच्या तांड्यांचें अमाप पीक पुन्हा तरारलें. शहरी भागांतून रोजगार शोधणाऱ्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी ग्रामीण भागांकडे धाव घेऊं लागल्या. तथापि युद्धानें विस्कळित झालेल्या अर्थव्यवस्थेची जसजशी पुनर्रचना होऊं लागली. तसतशी ही लाट पुन्हा उलटून शहरांकडे माणसांची रीघ लागूं लागली. जपानमधील कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढूं लागल्यानें लक्षावधि बेकार पुन्हा उद्योगधंद्यांत गुंतविले गेले. उद्योगधंद्याच्या प्रमुख विभागांत रोजगार शोधणारांच्या मानानें अधिक रोजगारी उपलब्ध आहे. परिणामी मजूर आणि मालकवर्ग ह्यांच्यांतील संबंधहि बदलत चालले आहेत. मजूरवर्ग आपल्या हक्कांविषयीं अधिक जागरूक झाला असून कारखानदार अधिक शहाणे झाले आहेत. वेतनांत वाढ होत आहे, कामाची परिस्थिति सुधारत आहे आणि उद्योगधंद्यांचें यांत्रिकीकरण सुयंत्रपणें चालू आहे.

## महाराष्ट्रांतील प्राचीन समाजांत गव्हाचें खाणें

डॉ. एच. सांकलिआ ह्यांनीं आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें महाराष्ट्रांतील प्राचीन लोकसमाज गहूं खात होता असा शोध लावला आहे. पुण्यापासून ७५ मैलांवर असलेल्या सोनगांव ह्या ठिकाणीं सरकारच्या पुरातत्व खात्याच्या मदतीनें त्यांनीं उत्खनन चालविलें होतें. सोनगांव येथें उत्खननाचें काम चालूं असतां त्यांना एक मातीचें भांडें सांपडलें. त्यांत कांहींसा जळालेला असा सुमारें १ किलो वजनाचा गहूं आढळून आला. त्यावरून त्यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं, इसवी सनापूर्वीं १२०० वर्षांच्या जवळपास महाराष्ट्रांतील लोक गहूं आणि त्याचे पदार्थ ह्यांचा खाद्य पदार्थ म्हणून उपयोग करीत असत. महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश पाडण्यासाठीं आजपर्यंत जितक्या ठिकाणांत उत्खनन करण्यांत आलें त्यांत अन्नधान्याचा मागमूस क्वचित लागलेला नव्हता. महाराष्ट्रांतील प्राचीन इतिहासांत महत्त्वाचें असलेलें जें नेवासें गांव त्याहि ठिकाणीं अन्नधान्य खाण्यांत असल्याचा पुरावा सांपडलेला नाहीं. त्या दृष्टीनें सोनगांव येथील शोधाला महत्त्व आहे. कारण, ३ हजार वर्षांपूर्वीं लोक काय खात असावेत ह्या प्रश्नावर त्यामुळें थोडासा प्रकाश पडला आहे. डेक्कन, कॉलेज आणि भारताचें पुरातत्व खातें आतां आणखी नवीन उत्खननाचीं कामें करणार आहे. त्यांत नर्मदा नदीवरील अमरकंटकपासून हुशंगाबादपर्यंतच्या ४०० मैलांच्या प्रदेशाचा अंतर्भाव आहे. २५ हजार वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांत मानवी इतिहासांतील अश्मयुग चालूं होतें. ह्या कालांतील मानवसमाज व त्याची स्थिति ह्यासंबंधीं संशोधन करण्याचा हा प्रयत्न आहे.

## पश्चिम युरोपला होणाऱ्या निर्यातींत घट

कलकत्ता येथें बोर्ड ऑफ ट्रेडची बैठक भरविण्यांत आली होती. ह्या बैठकींत पश्चिम युरोपांतील देशांना भारताकडून होणाऱ्या निर्यातींत जी घट झाली आहे, त्याचा विचार करण्यांत आला. पश्चिम युरोपांतील देशांनीं समायिक बाजारपेठेची स्थापना केल्यापासून अविकसित देशांच्या त्यांच्याकडे होणाऱ्या निर्यातीचा प्रश्न विशेष गंभीर स्वरूपाचा होऊं लागला आहे. समायिक बाजारपेठेंत सामील झालेल्या देशांनीं अधिकाधिक कडक अशीं बंधनें आयात होणाऱ्या मालावर बसविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळें अविकसित देशांच्या निर्यातींत घट होत चालली आहे. गेल्या आर्थिक वर्षांतील अनुभव पाहतां असें दिसतें कीं, त्यापूर्वींच्या चार वर्षांत पश्चिम युरोपांतील देश व भारत ह्यांच्यांतील व्यापाराचें वाढतें प्रमाण कमी होऊ लागलेलें आहे. १९६३ सालीं भारतानें बेल्जमला जवळजवळ १५ लाख रुपयांचें कापड निर्यात केलें होतें. १९६४ सालीं फक्त ५ लाख रुपयांचें कापड निर्यात होऊं शकलें. पश्चिम जर्मनी व इटाली ह्या देशांना करण्यांत येणाऱ्या निर्यातींतहि अशीच घट झालेली आहे. फक्त फ्रान्सनें अधिक कापड आयात केलें. कारण, कापडाच्या आयातीवरील बंधनें फ्रान्सनें थोडीं शिथिल केलीं होतीं. निर्यातीमधील घट ही एक बाजू झाली. पश्चिम युरोपांतील देशांकडून भारतांत आयात होणाऱ्या मालांत मात्र निर्यातीच्या घटीच्या प्रमाणांत कपात झालेली नाहीं. त्यामुळें परिस्थितीचें गांभीर्य अधिकच वाढलें आहे. अगदीं अलीकडे अविकसित देशांच्या प्रगत देशांकडे होणाऱ्या निर्यातींत वाढ करण्याच्या दृष्टीनें कांहीं उपाय सुचविण्यांत आले आहेत. परंतु ह्या उपायांची अंमलबजावणी प्रगत देश कशी करतात तें अद्याप दिसून यावयाचें आहे.

## हौशी प्रवाशांपासून अधिक उत्पन्न मिळणें शक्य

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत परदेशांतून येणाऱ्या हौशी प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी ८ कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविण्यांत आलें होतें. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या प्रवाशांना आधुनिक पद्धतीच्या सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत येणार आहे. परदेशांतून भारतांत येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत असली तरी ती आणखी वाढण्यास पुष्कळच वाव आहे. गेल्या वर्षीं १,५०,००० परदेशी प्रवाशांनीं भारतामधील प्रेक्षणीय ठिकाणांना भेटी दिल्या. जागतिक हौशी प्रवाशांपैकी एक टक्क्यापेक्षाहि कमी प्रवासी भारतांत येतात. जपान आणि इस्राएलसारख्या छोट्या देशांतहि ह्यापेक्षा अधिक प्रवासी जातात. ह्याचें कारण त्यांना हव्या असणाऱ्या सोयी येथें पुरेशा प्रमाणांत उपलब्ध नसतात.

### मच्छलीपट्टम् बंदराची सुधारणा

मच्छलीपट्टम् बंदरांत येणाऱ्या बोटींवर लोखंडाचें खनिज चढविण्याच्या सोयींत सुधारणा करण्याचें आंध्र प्रदेश सरकारनें कबूल केलें आहे. ह्या बंदरांतील अपुऱ्या सोयीमुळें बोटी भरण्यास वेळ लागतो. परदेशांतील ग्राहक ह्या बंदरांतून खनिजाची आयात करण्यास नाखूष असतात. अशा परिस्थितींत खनिज व धातु व्यापार मंडळाला हें बंदर लोखंडाच्या खनिजाच्या निर्यातीसाठी १ एप्रिलपासून बंद करावें लागलें. त्यानंतर भारत सरकारनें आंध्र प्रदेश सरकारशीं त्या बाबतींत वाटाघाटी केल्या. आंध्र सरकारनें बंदराची सुधारणा करण्याचें ठरविल्यामुळें ऑगस्टपासून तीन महिनेपर्यंत प्रयोग म्हणून खनिजाची निर्यात पुन्हा चालू करण्यांत येणार आहे.

---

### आणखी एक शेतकी कॉलेज

पुढील शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र सरकारनें रत्नागिरी जिल्ह्यांत एक शेतकी कॉलेज स्थापन करण्याचें ठरविलें आहे. नव्या कॉलेजविषयींची तपशीलवार योजना अद्याप तयार व्हावयाची आहे. कॉलेज बहुधा दापोली येथें काढण्यांत येईल आणि तें शिवाजी विद्यापीठाला जोडण्यांत येईल. राज्यांत स्थापन करण्यांत येणारें हें सातवें सरकारी शेतकी कॉलेज होईल. महाराष्ट्र राज्यांतील सरकारी शेतकी कॉलेजांशिवाय अमरावती येथें असलेल्या शेतकी कॉलेजला सरकारकडून अनुदान देण्यांत येत असतें. महाराष्ट्र राज्य अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण करण्यासाठी शेतकीच्या पदवीधरांची जास्त गरज भासूं लागली आहे.

---

### अमेरिकेच्या रणसाहित्याचा दुरुपयोग

कच्छच्या रणांत पाकिस्ताननें केलेल्या आक्रमणांत अमेरिकेनें दिलेल्या रणसाहित्याचा उपयोग करण्यांत आला. त्यासंबंधीं भारतानें घेतलेलीं छायाचित्रें अमेरिकेनें मान्य केलीं आहेत. वास्तविक ह्या साहित्याचा उपयोग कम्युनिस्ट देशांनीं आक्रमण केल्यास त्यांच्याविरुद्ध करावयाचा आहे. पाकिस्तानच्या वायव्येकडील बंडखोरांविरुद्ध अमेरिकन बॉंबफेकी विमानांचा वापर करण्यांत आला त्याहि वेळीं अमेरिकेवर पाकिस्तानला जाब विचारण्याची पाळी आली होती. अमेरिकेच्या ह्या विचारणेला पाकिस्ताननें दिलेलें उत्तर मासलेवाईक होतें. लष्करी मदतीच्या वापराची वांटणी पाकिस्ताननें निरनिराळ्या शत्रूसाठी निरनिराळीं, पृथकपणें करावी अशी अमेरिकेची अपेक्षा आहे काय, असा प्रतिप्रश्न पाकिस्ताननें विचारला होता.

---


### कच्छच्या रणांत भाताचें पीक येईल

पावसाळ्यांत कच्छच्या रणांत समुद्राचें पाणी शिरून जमीन खारी होते. पाणी हटल्यावर जमिनीवर मिठाचे थर पसरलेले दिसतात. समुद्राला बांध घालून खारें पाणी अडविण्यांत आल्यास ह्या खार जमिनींत नद्यांतील गोडें पाणी सोडून मिठाचा निचरा करतां येणें शक्य आहे. अशा रीतीनें सुधारलेल्या जमिनींत भाताचें पीक चांगलें येईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. कच्छच्या भूमीची सुधारणा करण्याची योजना पुरी करण्यांत आल्यावर सुमारें ५,००० एकर जमीन लागवडीला योग्य होईल. गुजरात राज्याला तांदळाची टंचाई भासत असते. शास्त्रीय पद्धतीनें अशी शेती करण्यांत आल्यास गुजरात राज्य तांदळाच्या बाबतींत स्वयंपूर्ण करणें शक्य आहे.


ठाकरसी फॅब्रिक्स
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड
SANFORIZED
THACKERSEY FABRICS
ठाकरसी शर्टिंग म्हणजे रुबाबदार कापड
डिझाइनचे किंवा साधे, हवी त्याची करा निवड
ठाकरसी ग्रुप ऑफ मिल्स



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

## मॅनेजिंग एजन्सी पद्धति

### कार्यकक्षा, अधिकार आणि मेहनताना ह्यांवर निर्बंध

मॅनेजिंग एजन्सी पद्धतीच्या कार्यपद्धतीसंबंधीं चौकशी करण्यासाठी भारत सरकारनें एक चौकशी मंडळ नेमलें आहे. सिमेंट, कागद, कापड आणि ताग ह्या धंद्यांतील मॅनेजिंग एजन्सीसंबंधीं विशेष चौकशी करण्यांत येणार आहे. मॅनेजिंग एजन्सी पद्धत ही आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानाशीं विसंगत असून मधल्या दलालांचे खिसे भरणारी आहे अशी तक्रार केली जात आहे, आणि ती पद्धत बंद करावी; निदान तिच्यांत आमूलाग्र सुधारणा करावी, असा आग्रह धरण्यांत येत आहे.

### प्रारंभ कसा झाला ?

गेल्या शतकाच्या उत्तरार्धांतील औद्योगिक प्रगतीनें मॅनेजिंग एजन्सी पद्धति रूढ केली. इंग्लंडमधून भांडवलाची आयात होत असे आणि आयात-निर्यात व्यापाराबरोबरच उद्योगधंदेहि वाढत होते तेव्हांची ही हकीकत आहे. इंग्रजांचें अनुकरण करून मुंबई आणि अहमदाबाद येथील कित्येक व्यापाऱ्यांनीं अमेरिकन सिव्हिल वॉर च्या वेळीं झालेले नफे कापडाच्या गिरण्यांत गुंतविण्यास आरंभ केला. परंतु, त्या मानानें गिरण्या चालविण्यांत प्रवीण असे लोक बेताचेच होते. मॅनेजिंग एजन्सी पद्धतीनें ह्यावर उपाय काढला. १८८२ सालीं एकूण ५०५ लिमिटेड कंपन्या होत्या, त्यांतील बहुसंख्य मॅनेजिंग एजन्सीच्या व्यवस्थेखालच्या होत्या. मेसर्स ऑर डिगमन आणि कंपनी ही कलकत्ता येथील सॉलिसिटर्सची फर्म मॅनेजिंग एजन्सीचे करार करून देणारांत प्रमुख होती.

स्वदेशी चळवळीनंतर उद्योगधंद्यांना पुन्हा आणखी प्रोत्साहन मिळालें आणि मॅनेजिंग एजन्सीजना आणखी वाव मिळाला, आणि कपास आणि ताग ह्यांच्या पाठोपाठ लोखंड-पोलादासारख्या उपक्रमांना चालना मिळाली. मॅनेजिंग एजन्सी पद्धतीनें ह्या बाबतींत महत्त्वाची कामगिरी बजावली. १९१५-१८ च्या औद्योगिक कमिशननें म्हटलें. आहे, "वैयक्तिक मॅनेजिंग डायरेक्टरांच्या व्यवस्थेपेक्षा मॅनेजिंग एजन्सींच्या व्यवस्थेनें जास्त यश मिळविलेलें आहे." फिस्कल कमिशननें १९६० सालीं नमूद केलें आहे, "औद्योगिकरणाच्या प्रारंभींच्या काळांत जेव्हां साहस किंवा भांडवल पुरेसें नव्हतें, त्या वेळीं मॅनेजिंग एजन्सींनें दोन्हीं पुरविलीं. कपास, ताग, पोलाद, इत्यादींच्या आजच्या भरभराटीचें श्रेय कित्येक सुप्रसिद्ध मॅनेजिंग एजन्सी गृहांना द्यावें लागेल."

### वाढत गेलेली व्याप्ति

दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतींत कित्येक दोष निर्माण झाले आणि व्यवस्थेचा दर्जा खालावला. तथापि, ह्या एजन्सीच्या पद्धतीची व्याप्ति वाढतच होती. १९५४-५५ मध्यें एकूण ३,९९४ मॅनेजिंग एजन्सीज अस्तित्वांत होत्या आणि त्यांच्या व्यवस्थेखालीं एकूण २९,६२५ कंपन्यांपैकी ५,०५५ कंपन्या होत्या. ह्याचा अर्थ, प्रत्येक सहा कंपन्यांपैकी एक कंपनी मॅनेजिंग एजंटस चालवीत होते. एकूण कंपन्यांच्या एकूण ९७० कोटी रु. वसूल भांडवलापैकी ४६५ कोटी रु. वसूल भांडवल मॅनेजिंग एजंटांच्या अधिकारांत होते. ह्याचा अर्थ, त्यांची सत्ता ४८% वसूल भांडवलावर चालत होती. एकूण कंपन्यांतून बँका आणि विमा कंपन्या वगळल्या (कारण, त्यांना मॅनेजिंग एजंट असणें कायदेशीरच नाहीं) तर हें प्रमाण ५०.४% होतें. मॅनेजिंग एजंट्सच्या अखत्यारींत येऊं न शकणाऱ्या सरकारी कंपन्या वगळल्यावर हें प्रमाण ५४% पर्यंत वाढतें. मॅनेजिंग एजन्सीचें प्रमाण पब्लिक कंपन्यांत जास्त होतें; त्यांतील ६६.३% वसूल भांडवलाच्या ४०.७% कंपन्या मॅनेजिंग एजन्सीखाली होत्या. ह्याउलट, ८.६% वसूल भांडवलाच्या ४.९% खासगी कंपन्यांना मॅनेजिंग एजंट होते.

### सरकारचे वाढते अधिकार

१९५४-५५ नंतर मात्र मॅनेजिंग एजन्सीमधील वाढत्या दोषांमुळें ती पद्धत टीकेस पात्र झाली. मॅनेजिंग एजंटांचे मोठाले नफे म्हणजे मध्यस्थांनीं लुबाडलेले नफे, अशी राजकीय प्रणाली सुरू झाली. सरकारनें मॅनेजिंग एजन्सीचें अधिकारक्षेत्र मर्यादित करण्यास प्रारंभ केला. कंपनी कायद्याच्या विलावरील चर्चेत सप्टेंबर, १९५५ मध्यें सरकारतर्फे सांगण्यांत आलें कीं, हा कायदा अमलांत आल्यादिवशीं जुनी मॅनेजिंग एजन्सी पद्धत संपुष्टांत येईल, पुनर्घटित नवी मॅनेजिंग एजन्सीहि मर्यादित काळ अमलांत राहील. सरकार त्यासंबंधांत चौकशी करून विशिष्ट धंद्याला मॅनेजिंग एजन्सी आवश्यक आहे किंवा नाहीं तें ठरवील. प्रस्तुत कायद्यानें (१९५६ चा कंपनी कायदा) सरकारला मॅनेजिंग एजन्सीजवरील नियंत्रणाचें व्यापक अधिकार दिले. कराराची मुदत वाढविण्यास सरकारची पूर्वसंमिती, मॅनेजिंग एजंटांना मिळावयाच्या मेहेनतान्यावर बंधनें, कंपन्यांचे वतीनें मॅनेजिंग एजंटांनीं मालाची खरेदी - विक्री करण्यास आळा, इत्यादीबाबत ते अधिकार व्यापक होते. सरकारनें कायद्याची अंमलबजावणी जारीनें केली असून त्याबाबत सरकारला सल्ला देण्यासाठी कंपनी लॉ ॲडव्हायसरी कमिटी नेमली आहे. ह्या सर्वांचा परिणाम होऊन मॅनेजिंग एजंटांचा मेहेनताना कमी झाला आहे. मॅनेजिंग एजन्सीजची संख्याहि कमी झाली आहे.

### फक्त ५% कंपन्यांना मॅनेजिंग एजंट

आजच्या सुमारें ३०,००० कंपन्यांपैकी फक्त १,५०० म्हणजे ५% कंपन्यांना मॅनेजिंग एजंट आहेत. सुमारें ८०० मॅनेजिंग एजन्सीज प्रत्येकी एक कंपनी चालवितात; बाकीच्यांच्या व्यवस्थेखालीं एकापेक्षा जास्त कंपन्या आहेत. विद्यमान मॅनेजिंग एजन्सीजचे करार लवकरच फेरतपासणीसाठी येतील आणि त्यांची कक्षा आणखी मर्यादित केली जाण्याचा रंग दिसतो.

### मॅनेजिंग एजन्सीखालील जॉईंट स्टॉक कंपन्या

| | पब्लिक | | प्रायव्हेट | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | वसूल भांडवल (कोटी रु.) | संख्या | वसूल भांडवल (कोटी रु.) | संख्या | वसूल भांडवल (कोटी रु.) |
| (१) मॅनेजिंग एजन्सीखालील कंपन्या | ४०९१ | ४३९.० | ९६४ | २६.४ | ५०५५ | ४६५.४ |
| (२) १९५४-५५ मधील एकूण कंपन्या | १००५६ | ६६२.५ | १९५६९ | ३०८.३ | २९६२५ | ९७०.८ |
| (३) बँकिंग व विमाकंपन्या वगळून एकूण कंपन्या | ९१७८ | ६१६.६ | १९४६४ | ३०७.३ | २८६४२ | ९२३.९ |
| (४) १ चे २ शी % | ४०.७ | ६६.३ | ४.९ | ८.६ | १७.१ | ४७.९ |
| (५) १ चे ३ शी % | ४४.६ | ७१.२ | ४.९ | ८.६ | १७.७ | ५०.४ |

**स्टॅलिनच्या नांवाचें स्वागत**—नाझी जर्मनीवर मिळविलेल्या विजयाचा २० वा वर्षदिन मास्कोमध्यें साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं बोलतांना रशियन कम्युनिस्ट पक्षाचे पहिले चिटणीस मि. ब्रेझनॉव्ह ह्यांनीं स्टॅलिनच्या नांवाचा उल्लेख करतांच उपस्थित श्रोत्यांनीं १५ सेकंदपर्यंत टाळ्या वाजवून ह्या उल्लेखाचें स्वागत केलें. ह्या सभेच्या प्रसंगीं मार्शल झुकॉव्ह हजर होते. जर्मनीवर विजय मिळविण्यास त्यांचा फार मोठा हातभार लागलेला असतांनाहि १९५७ सालीं त्यांना पदभ्रष्ट करण्यांत आलें होतें. पण प्रस्तुत समारंभांत ते वरिष्ठ सरकारी व लष्करी पुढाऱ्यांत बसलेले दिसत होते.

**बिहारमधील सहकारी साखर कारखाना**—पूर्णिआ जिल्ह्यांत बिहारमधील पहिला सहकारी साखर कारखाना काढण्यांत येणार आहे. त्याचा पायाभरणी समारंभ नुकताच करण्यांत आला. कारखान्याच्या उभारणीसाठी १·६ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. बांधणीच्या कामास २ वर्षे लागतील. भांडवलउभारणीसाठी इंडस्ट्रिअल फायनॅन्स कार्पोरेशननें ९० लाख रुपयांचें कर्ज दिलें आहे. कारखान्यांत दररोज १,००० टन ऊंस गाळूं शकणारी यंत्रसामग्री बसविण्यांत येणार आहे.

**लोकसभेच्या दूधकेंद्रांतहि भेसळ**—भारताच्या लोकसभेंत दूध व इतर पेयें देण्यासाठी एक केंद्र उघडण्यांत आलेलें आहे. कांहीं दिवसांपूर्वी लोकसभेच्या एका सदस्यानें केंद्रांतून दही विकत घेतलें. दही चांगलें नसल्याचा संशय आल्यावर त्याची तपासणी करण्यांत आली. तेव्हां त्यांत टीपकागद मिसळण्यांत आल्याचें दिसून आलें. नंतर हें प्रकरण लोकसभेच्या सभापतींच्या नजरेस आणण्यांत आलें. ह्या गैरप्रकाराची त्यांनीं गंभीर दखल घेतली आणि अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांना त्याची माहिती दिली. आतां ह्या प्रकरणाची चौकशी करण्यांत येणार आहे.

**आदिवासी प्रदेशांतील सावकारी**—चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कामांत मध्यप्रदेशांतील आदिवासी विभागांतील सावकारी नष्ट करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. ह्या भागांत सध्यां सावकारी दृढमूल झालेली असून सावकारांचे व्याजबट्ट्याचे दर कधीं कधीं एक हजार टक्क्यांपर्यंत असतात असें आढळून आलें आहे.

**सावध राहण्याचा इषारा**—प्रणयरम्य कादंबऱ्या लिहिणाऱ्या एका इंग्रजी लेखिकेनें स्त्रियांना ओठशलाका वापरण्याविरुद्ध इषारा दिला आहे. त्यांच्या वापरामुळें कातडीचे रोग, कॅन्सर, ह्यांचा धोका निर्माण होतो. बहुतेक स्त्रिया हलक्या प्रतीच्या आणि गडद रंगाच्या शलाका वापरतात. पाश्चात्य स्त्री दरसाल निदान २० तरी ओष्ठशलाका वापरते.

**गिरचे सिंह पहाण्यास गर्दी**—गिरच्या जंगलांत वन्य अवस्थेंत मोकळेपणी फिरणारे सिंह पहाण्यासाठी येणारी प्रवाश्यांची गर्दी वाढू लागली आहे. गेल्या वर्षापेक्षा ह्या वर्षी ३० टक्के अधिक प्रवासी आले. गुजरात सरकार अधिक प्रवासी आकर्षित करण्यासाठी त्यांना अधिक सोयी उपलब्ध करून देत आहे.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३। ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ५ ,, |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

**सरदारगृह**

**मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**


— आमचीं वैशिष्टयें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.


फोन नं. :-३८३३७] सरदारगृह मा. लि. [ तार-सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

## एकूण पुरवठ्याशीं आयातीचे प्रमाण

| | संख्येचें परिमाण | १९५०–५१ एकूण पुरवठा (अ) | १९५०–५१ आयातीचें (अ) शी प्रमाण % | १९६३–६४ एकूण पुरवठा (अ) | १९६३–६४ आयातीचें (अ) शीं प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|
| सायकली | '००० संख्या | २६४ | ६२.५ | १२६० | ०.१ |
| साखर कारखान्याचीं यंत्रें | लक्ष रु. | १०० | १००.० | ६५० | ४.६ |
| कपास कापडाच्या गिरण्यांचीं यंत्रें | लक्ष रु. | उपलब्ध | नाहीं | ३७५० | ४८.० |
| पेट्रोलिअमचे पदार्थ | द. लक्ष लिटर | २७.२५ | ९२.९ | ९६२० | २७.९ |
| सोडा ॲश | '००० टन | ७५ | ४०.० | २९७ | ७.७ |
| ब्लीचिंग पावडर | '००० टन | ९.४ | ६१.७ | ८.४ | १८.१ |
| लोखंड–पोलाद | '००० टन | १३९१ | २५.२ | ५२.८० | १८.६ |
| कॉस्टिक सोडा | '००० टन | ३४ | ६४.७ | २२८ | २८.५ |
| ॲल्युमिनिअम | '००० टन | १४.७ | ७२.८ | ७८.७ | ३१.४ |
| मशीन टूल्स | लक्ष रु. | ३५.६ | ९१.६ | ५०७५ | ६०.४ |
| न्यूजप्रिंट | '००० टन | ७६.३ | १००.० | १२५.५ | ७६.१ |
| कपास | १८८ कि.ग्रॅ.च्या गासड्या | ३९.५ | २७.६ | १२५.५ | १२.९ |
| अन्नधान्यें | द. लक्ष टन | ५६.२४ | ६.५ | ८३.६ | ४.७ |
| ताग | १८० कि.ग्रॅ.च्या गासड्या | ५७.२ | ३५.३ | ६२.१ | ४.३ |
| शिवणाचीं यंत्रें | '००० संख्या | ५६ | ४१.१ | २८४ | ०.७ |
| कागद, इ. | '००० टन | १५१ | २३.२ | ५०३ | ५.० |

## जगांतील श्रीमंत राष्ट्रें

### कुवेतचा अनुक्रम पहिला; भारताचा ८५ वा

जगामध्यें आपलें आर्थिक स्थान कोणतें आहे, हें तपासून पाहण्याचा सोपा मार्ग म्हणजे दर माणशीं राष्ट्रीय उत्पन्नाचा हिशेब करून त्याची इतरांच्या दर माणशीं राष्ट्रीय उत्पन्नाशीं तुलना करणें, हा होय. पण राहणीच्या खर्चाचें मान, जिनसांच्या उपभोगाच्या पद्धतीमधील फरक, उत्पन्नाची वांटणी, इत्यादींची दखल त्यांत घेतलेली नसते. म्हणून, अशा तुलना मार्गदर्शक असल्या, तरी त्या निर्णायक समजतां कामा नयेत. तरीसुद्धां, अशा तुलनांमुळें कांहीं गैरसमज दूर होण्यास मदत होते. उदाहरणार्थ, अमेरिका हा जगांतील सर्वांत श्रीमंत देश नाहीं. दर माणशीं राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केला, तर अग्रस्थान कुवेतला द्यावें लागेल. त्यासालोसाल कातारचा अनुक्रम लागतो.

कुवेत आणि कातार हे दोन्ही देश त्यामागोमाग येणाऱ्या अमेरिकेच्या दुप्पट श्रीमंत आहेत, आणि त्यांचें हें स्थान दीर्घ काळ टिकून राहील. कारण खूप तेल आणि अगदीं कमी लोकसंख्या, ह्यांची तेथील युति! हे दोन छोटे देश वगळले, तर अमेरिका इतर सर्व देशांत अग्रेसर आहे; त्याची बरोबरी इतर कुठल्याहि देशाला आणखी दहा–पंधरा वर्षांत तरी करतां येणें अशक्य आहे.

ग्रेट ब्रिटनचा अनुक्रमहि आश्चर्याचा धक्का देण्यासारखा आहे. कॅनडा, स्वीडन, ऑस्ट्रेलिया हे देश ग्रेट ब्रिटनपेक्षा श्रीमंत असणार, हें गृहीतच आहे. पण स्वित्झरलंड, लक्झेंबर्ग, डेन्मार्क, न्यूझीलंड, फ्रान्स, जर्मनी हे देशहि ग्रेट ब्रिटनच्या पुढें आहेत. डेन्मार्क, फ्रान्स आणि जर्मनी ह्यांच्या प्रगतीचा वेग प्रचंड असून ते देश व ग्रेट ब्रिटन ह्यांचेमधील अंतर वाढत चाललें आहे. ग्रेट ब्रिटन मागें पडत चालला आहे. पहिल्या पंधरांत इस्राएल आणि वेनेझुएल ह्यांचा समावेश होत नसला तरी ते जपानच्या पाठोपाठ प्रगति करीत आहेत. जपान दरसाल १०% ह्या गतीनें गेलीं कित्येक वर्षे वाटचाल करीत आहे. त्याचेपाठोपाठ अर्जेंटिना, दक्षिण आफ्रिका, चिली आणि त्रिनिदाद हे देश येत आहेत. सुमारें १०० देशांत भारत आणि चीन ह्यांचा अनुक्रम ८५ वा लागतो. इंडोनेशिआ, लाओस, नेपाळ, एथिओपिआ आणि कंबोडिआ हे त्यांचे पाठोपाठ रेंगाळत आहेत. रशिआविषयीं जी माहिती उपलब्ध आहे, त्यावरून त्याचा अनुक्रम सुमारें १५ वा, वेनेझुएल, झेकोस्लोव्हाकिआ, पूर्व जर्मनी, पोलंड, हंगेरी, रुमेनिआ आणि बल्गेरिआ ह्यांचे साधारण बरोबर लागेल.

गेल्या चार वर्षांतील प्रगतीचा वेग लक्षांत घेतला आणि येत्या दहा वर्षांचा अंदाज केला, तर पहिल्या तीन जागांत फरक पडणार नाहीं. पण डेन्मार्क, स्वीडन, जपान आणि जर्मनी हे देश स्पर्धेनें एकमेकांपुढें जातांना दिसतील. शेवटच्या १५ व्या जागेसाठी ग्रेट ब्रिटनला लठालठी करावी लागेल.

### सर्वांत श्रीमंत १५ राष्ट्रें

| १९६३ | १९६२ |
|---|---|
| कुवेत | कुवेत |
| कातार | कातार |
| अमेरिका | अमेरिका |
| कॅनडा | कॅनडा |
| स्वित्झरलंड | स्वीडन |
| न्यूझीलंड | स्वित्झरलंड |
| लक्झेंबर्ग | लक्झेंबर्ग |
| स्वीडन | ऑस्ट्रेलिया |
| ऑस्ट्रेलिया | न्यूझीलंड |
| ग्रेट ब्रिटन | डेन्मार्क |
| नॉर्वे | प. जर्मनी |
| डेन्मार्क | फ्रान्स |
| फ्रान्स | ग्रेटब्रिटन |
| बेल्जम | नॉर्वे |
| प. जर्मनी | बेल्जम |

**बद्रिनाथ मंदिर यात्रिकांना खुलें झालें**—बद्रिनाथ मंदिराचे दरवाजे १२ मे रोजीं यात्रेकरूंसाठी खुले करण्यांत आले. गेल्या नोव्हेंबरमध्यें तें बंद करतेवेळीं आंत तेवत ठेवलेला दिवा तसाच तेवत असलेला आढळला.

**शेख अबदुल्लांची विनंती**—तामीळ भाषा शिकविणारा एक शिक्षक, घोडेदौडीसाठी घोडा आणि एक मुसलमान आचारी मिळण्याची अब्दुलांनीं जिल्हा कलेक्टरला विनंती केली आहे. सध्या त्यांना दिलेला आचारी मुसलमान नाहीं.

**नेहरू तिकीट**—पं. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या पहिल्या वर्षश्राद्ध तिथीला, २७ मे रोजीं, सरकार १५ पैसे किंमतीचें एक खास पोस्टाचें तिकीट काढणार आहे. ह्या दुरंगी तिकिटावर जवाहर ज्योति आणि गुलाबाचें फूल चित्रित करण्यांत येईल.


**केरळमधील सुवर्णकारांना मदत**—सोन्यावरील निर्बंधामुळें केरळ राज्यांत सुमारें १९ हजारांवर लोक आपल्या पोटापाण्याच्या व्यवसायाला अंतरले होते. त्यांना आर्थिक मदत करण्यासाठी राज्यसरकारनें आतांपर्यंत ३·७० लाख रुपये खर्च केले आहेत. सुवर्णकारांना कर्जाच्या अगर देणग्यांच्या रूपानें मदत देण्यांत आली. त्याशिवाय, त्यांच्या मुलांना शाळेंतील पाठ्यपुस्तकें मोफत देण्यांत आलीं.

**अन्नधान्याबाबत हवाला**—४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारत अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण होईल असा हवाला मध्यवर्ती अन्नमंत्री श्री. सी. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं दिला आहे. गेल्या वर्षी अन्नधान्याचें उत्पादन ७·९८ कोटी टन आलें होतें. ह्या वर्षी तें ८·७२ कोटीपर्यंत वाढलें आहे. हवापाणी अनुकूल लाभलें तर पुढील वर्षी उत्पादन ९·२ कोटी टनांपर्यंत जाईल असा अंदाज आहे.

**परदीप येथील बंदर**—ओरिसा राज्यांतील परदीप ह्या बंदराच्या विकासाचें काम भारत सरकारनें आपल्याकडे घेण्याचा निर्णय घेतला आहे. ओरिसा सरकारनें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत हें काम हातीं घेतलें होतें. त्यासाठी सुमारें ३८·३१ कोटी रुपये खर्च येणार आहे. ओरिसा सरकारच्या विनंतीप्रमाणें कामाबद्दलचा बदल करण्यांत आला आहे.

**केळ्यांच्या निर्यातीचे प्रयत्न**—भारतामधील केळी पूर्व जर्मनीला निर्यात करण्याची शक्यता अजमावण्यासाठी पूर्व जर्मनीच्या प्रतिनिधि मंडळानें भारतांत दौरा काढला होता. प्रयोग म्हणून कोइमतूर भागांतील कांहीं केळी पूर्व जर्मनीला निर्यात करण्यांत येणार आहेत. प्रयोग यशस्वी झाल्यास उभयता देशांच्या दरम्यान करार करण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



## बिगर बँकिंग कंपन्यांकडील ठेवी

### भागीदारांकडून ठेवी घेतल्या, तरी रिटर्न्सची सक्ती

ज्या बिगर बँकिंग संस्था जनतेकडून ठेवी घेतात किंवा बँकिंगच्या व्याख्येंत न बसतां बँकिंगच्या प्रकारचा व्यवसाय करतात, अशांच्यावर देखरेख ठेवून त्यांच्या व्यवहारांचें नियमन करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला गेल्या वर्षी मिळाला. रिझर्व्ह बँक कायद्याच्या दुरुस्तीच्या ४५ (क) ह्या कलमान्वयें बिगर-बँकांना ती तक्ते पाठविण्यास, माहिती पुरविण्यास, ठेवींचा तपशील देण्यास, व्याजाचे दर कळविण्यास, सक्ती करूं शकते; त्यांच्या धंद्याचा तपशील मागवूं शकते. ह्या अधिकारान्वयें रिझर्व्ह बँकेनें १४ मे, १९६४ रोजी तीन ऑर्डर्स काढल्या.

आतां ह्या ऑर्डरी रद्द करून त्यांचे जागीं नवीन ऑर्डरी काढल्या आहेत. फक्त आपल्या भागीदारांकडूनच (आणि दुसऱ्या कुणाकडूनहि नाही) ठेवी घेणाऱ्या कंपन्यांनाहि ह्या ऑर्डरी लागू होतात किंवा नाहीं, ही शंका दूर करण्यासाठी अशा सर्व कंपन्यांनीं रिटर्न्स धाडलींच पाहिजेत, असें आतां स्पष्ट करण्यांत आलें आहे. त्यामुळें, फक्त भागीदारांकडून ठेवी घेणाऱ्या कंपन्यांनाहि रिटर्न्स घालावीं लागतील. डायरेक्टर, डिव्हिजन ऑफ पब्लिकेशन्स अँड प्रेस रिलेशन्स, इकॉनॉमिक डिपार्टमेंट, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई १ ह्यांचेकडे आतां रिटर्न्स धाडावयाचीं आहेत. कांहीं फॉर्म्सचीं हेडिंग्ज बदलण्यांत आलीं आहेत. आणि रिटर्न्स पाठविण्याच्या तारखांतहि बदल करण्यांत आला आहे. ३१ मार्च, १९६५ अखेरचीं रिटर्न्स आतां १५ जून, १९६५ अखेर पाठवितां येतील. ह्या ऑर्डरींचा भंग करणाऱ्या कंपन्यांवर रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४५.० कलमाप्रमाणें इलाज केला जाईल.

---

## म्हैसूर राज्यांत सिमेंटचा मोठा कारखाना

म्हैसूर राज्यांत सीमेंट तयार करणारा एक मोठा कारखाना उभारला जाण्याची शक्यता आहे. ह्या कारखान्यांत दरसाल ५ लाख टन सिमेंट तयार करूं शकणारी यंत्रसामग्री बसविण्याचा मानस आहे. देशांतील सिमेंटचा तुटवडा लक्षांत घेऊन सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ ह्या औद्योगिक संघटनेनें अशा प्रकारचे ६ कारखाने उभारण्याची तयारी चालविली आहे. ह्या मालिकेपैकीच हा एक कारखाना आहे. म्हैसूर राज्याचे उद्योगमंत्री आणि कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर ह्यांच्यांत कारखान्यांच्या उभारणीसाठी नुकतींच बोलणीं झालीं. कारखान्यांच्या उभारणीची जागा अद्याप निश्चित करण्यांत आलेली नाहीं.

---

## मुंबई विद्यापीठाला वाचनालयाची देणगी

गोव्यामधील प्रसिद्ध इतिहाससंशोधक डॉ. पिसुर्लेकर ह्यांनीं आपल्याजवळील अमोल ग्रंथसंग्रह मुंबई विद्यापीठाला देणगी म्हणून दिला आहे. ग्रंथसंग्रहांत ६ हजार पुस्तकें आहेत. शिवाय कांहीं मायक्रोफिल्म्स आणि छायाचित्रे ह्यांचाहि त्यांत समावेश आहे. ग्रंथसंग्रहांत १६ व्या व १७ व्या शतकांत लिहिलेले मराठी भाषेंतील कांहीं ग्रंथ असून त्यांची लिपि मात्र रोमन आहे. छत्रपति शिवाजी महाराजांच्या निधनानंतर ४० वर्षांनीं लिहिलेलें अशा प्रकारचें एक चरित्रहि त्यांत आहे. त्याशिवाय १७ व्या शतकांत संपादित करण्यांत आलेला पोर्तुगीज-कोंकणी शब्दकोश, अनेक नकाशे आणि इतिहाससंशोधनास उपयुक्त ठरण्यासारखें इतर साहित्य ह्यांचाहि देणगींत समावेश आहे.

---

## बोकॅरो पोलाद कारखान्याची मंद वाटचाल

बोकॅरो येथें उभारण्यांत यावयाच्या पोलाद कारखान्यासंबंधीं तपशीलवार अहवाल तयार करण्याचें काम रशिअन तंत्रज्ञ करीत आहेत. ह्या कारखान्याच्या पहिल्या टप्प्यांत २० लाख टन पोलाद तयार होणार आहे. हें पोलाद कोणत्या स्वरूपाचें असावें ह्याविषयींचा अहवालहि तयार करण्याचें काम त्यांनीं आतां स्वीकारलें आहे. अहवाल आणि संबंधित आराखडे भारत सरकारकडे येण्यास चालू वर्षाचा ऑक्टोबर महिना उजाडेल आणि कारखान्याच्या जागीं प्रत्यक्ष कामाची सुरवात वर्षअखेर होईल असा अंदाज आहे. तथापि, कारखाना उभारणीचें प्राथमिक तयारीचें कामहि अजून बरेंच व्हावयाचें आहे. कारखान्यासाठी एकूण ४० हजार एकर जमीन लागणार आहे. बिहारचें सरकार ती मिळविण्याच्या खटपटींत आहे. परंतु, अजून सर्व जमीन सरकारच्या ताब्यांत आलेली नाहीं. कारखान्याला पाण्याचा पुरवठा करण्यासाठी दामोदर नदीवर बांधण्यांत यावयाच्या धरणाचें कामहि अद्याप सुरू करण्यांत आलेलें नाहीं. दुसऱ्या एका नदीवर बांधावयाच्या धरणाचें कामहि सुरू झालेलें नाहीं. कारखान्याची वाहतूक नीट चालण्यासाठी गाड्या मोडण्या-जोडण्याचें मोठें आवार बांधावें लागेल. ह्या कामासाठी ७.५ कोटी रुपये खर्च लागणार आहे. साऊथ ईस्टर्न रेल्वे हे काम करण्यास तयार आहे. परंतु अजून आवाराची जागाच निश्चित करण्यांत आलेली नाहीं. कारखान्याला लागणारा धुतलेला कोळसा पुरविण्याचीं दोन केंद्रें पुढील वर्षाअखेर चालूं होतील. नॅशनल कोल डेव्हलपमेंट बोर्डातर्फे त्यांचें काम चालूं आहे. कारखान्याला लागणाऱ्या कोळशाच्या खाणीचें काम अमेरिकेच्या मदतीनें करण्यांत यावयाचें आहे. परंतु समाजवादी देशातर्फे करण्यांत येणाऱ्या विकासाच्या कामीं अमेरिकेची मदत नियमाप्रमाणें वापरतां येणार नाहीं, असें अमेरिकेनें बजावलें आहे.

---

## खताच्या कारखान्याची उभारणी

भारतामधील शेतीच्या मालाचें उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा उपयोग करण्याबद्दल आतां मतभेद राहिलेले नाहींत. परंतु अशा खतांचें उत्पादन करणारे कारखाने भारतांत पुरेसे नाहींत,ही उणीव दूर करण्यासाठी भारत सरकार अमेरिकन कारखानदारांच्या एका गटाशीं वाटाघाटी करीत आहे. ह्या वाटाघाटींत महत्त्वाच्या मुद्याबद्दल उभयता पक्षांत एकमत झाल्याची वार्ता आहे. ह्या बाबतींत बोलतांना अमेरिकन गटाचा एक प्रवक्ता म्हणाला कीं दोन्ही बाजूंनीं आपआपले विचार स्पष्टपणें मांडले असून त्याबद्दल परस्परांना स्पष्ट कल्पना आलेली आहे. भारतामधील खताची निर्मिती वाढविण्याची तांतडीची गरज असल्यानें तावडतोब अंमलांत आणतां येण्यासारख्या एखाद्या खतनिर्मितीच्या कार्यक्रमाची रूपरेषा आंखण्याचे काम आतां सुलभ झालें आहे. अमेरिकन गटाचे दोन प्रमुख तज्ज्ञ वाटाघाटीसाठी मुद्दाम भारतांत आलेले होते. आतां ते परत गेले असून एका आठवड्याच्या आंत निश्चित योजना तयार करून सरकारला सादर करतील. अमेरिकन कारखानदारांनीं भारताच्या गरजा लक्षांत घेऊन त्या पूर्ण करण्याची तयारी दाखविली आहे. सरकारचें म्हणणें असें होतें, कीं खत-कारखान्यांच्या संकल्पित संघटनेंत अमेरिकन कंपन्यांचें भागभांडवल अल्पमतांत असावें. शिवाय कारखाने उभारण्याच्या कामीं त्यांनीं सांगितलेल्या खर्चांतहि कपात करण्यांत यावी. अशा पद्धतीनें खताचे पांच कारखाने स्थापन करण्याचा सरकारचा इरादा आहे.

## १९६४ मधील बँकिंग

### रिझर्व्ह बँकेची प्रभावी उपाययोजना

"रिपोर्ट ऑन ट्रेन्ड अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया—१९६४" हा रिझर्व्ह बँकेचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत रिझर्व्ह बँकेनें पतपुरवठ्याच्या नियंत्रणाचें आंखलेलें धोरण स्पष्ट करून सांगितलेलें आहे. सप्टेंबर, १९६४ च्या मध्याच्या सुमारास, एका वर्षाच्या पूर्वीच्या मानानें, किंमती १५·५% वाढल्या होत्या; अन्नधान्यांच्या किंमतीमधील वाढ ह्यापेक्षा दुप्पट झालेली होती. बँकांचा कर्जपुरवठा १९% जास्त झाला होता. तेव्हां रिझर्व्ह बँक रेट ४½% चा ५% केला आणि पतपुरवठ्याच्या धोरणांत महत्त्वाचे फेरफार केले. 'कोटा' पद्धतीऐवजीं लिक्विडिटीवर आधारित पद्धती सुरू केली. लिक्विडिटीचें किमान प्रमाण २८% वर आणून ठेवलें. बँकांकडे ठेवींचा ओघ वाढावा, ह्यासाठी ठेवींवरील व्याजाचे दरांत सुधारणा घडवून आणली. १७ फेब्रुवारी, १९६५ रोजीं बँक रेट ६% करण्यांत आला. शेड्यूल्ड बँकांना द्यावयाच्या कर्जांच्या अटी आणखी आवळण्यांत आल्या. कर्जे आणि ठेवी ह्यांचेवरील व्याजाचे कमाल दर वाढविण्यांत आले आणि प्रथमच ९१ दिवस, ६ महिने, १ वर्ष ह्या मुदतीच्या ठेवींना आणि सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवींना किमान व्याजाचे दर ठरवून देण्यांत आले. बँका आणि बिगर-बँकिंग संस्था ह्यांच्या ठेवींवरील व्याजामधील तफावत आतां कमी झाली आहे. ह्या सर्व योजनांमुळें, बँकांना स्वावलंबी होणें आवश्यक झालें आहे.

१९६४ मध्यें शेड्यूल्ड बँकांच्याकडील उपलब्ध पैशांत ३२४ कोटी रुपयांची वाढ झाली. त्यापैकी ठेवींमुळें २७१ कोटी रु. वाढले. शेड्यूल्ड बँकांनीं १९६३ मध्यें रिझर्व्ह बँकेकडील उचल १२·६ कोटी रुपयांनीं उतरविली होती, तर १९६४ मध्यें ती २७·३ कोटी रुपयांनीं वाढविली. बँकांनीं जास्त कर्जें दिलीं, त्यांवरील व्याजाचा दरहि वाढविला. त्यामुळें ठेवींवरील व्याज आणि कारभाराचा खर्च वाढूनहि त्यांचे नफे वाढले. १९६४ सालीं एकूण ७९ बँकांचें विलीनीकरण आणि पुनर्घटना करण्यांत येऊन बँकिंगची मजबुती वाढविण्यांत आली.

### शेड्यूल्ड बँकांचे फंड
(आंकडे कोटी रुपयांचे)

| | १९६४ | १९६३ |
|---|---|---|
| **कोठून आले** | | |
| (१) वसूल भांडवलांत व रिझर्व्हज-मध्यें वाढ | ५·२ | ४·४ |
| (२) ठेवींत वाढ | २७१·० | २१३·९ |
| (३) रिझर्व्ह बँकेकडील उचलींत वाढ | २७·३ | — |
| (४) परदेशांतून आलेले फंड | ०·३ | १·४ |
| (५) इतर | २०·६ | ५२·८ |
| एकूण | ३२४·४ | २७२·५ |
| **विनियोग** | | |
| (१) रिझर्व्ह बँकेकडील उचलींत घट | — | १२·६ |
| (२) दिलेल्या कर्जांत वाढ | २३०·५ | १५९·१ |
| (३) कॅशमध्यें वाढ | १८·९ | ८·७ |
| (४) इनव्हेस्टमेंटमध्यें वाढ | ७५·० | ९२·१ |
| एकूण | ३२४·४ | २७२·५ |

### स्वामी विवेकानंदांचें स्मारक

कन्याकुमारीपासून १ हजार फुटांवर असलेल्या विवेकानंद खडकावर त्यांचें स्मारक उभारण्याची योजना आतां निश्चित झाली आहे. मद्रास सरकारच्या विचारानें स्मारकाचें स्वरूप ठरविण्यांत आलें आहे. ह्या खडकावर देवळासारखी एक इमारत आणि एक मंडप बांधण्यांत येणार आहे. बांधकामासाठी ३१·५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. बांधकामाला प्रारंभ करण्यांत आला असून त्यासाठी लागणारी रक्कम उभारण्यासाठी निरनिराळ्या राज्यांतून स्थानिक कमिट्यांची स्थापना करण्यांत येणार आहे. मंडपाच्या भिंतीवर वेदामधील आणि स्वामी विवेकानंदांच्या ग्रंथांतील निवडक अवतरणें दगडांत खोदून बसविण्यांत येतील. त्याशिवाय स्वामीजींच्या कांहीं ठळक प्रसंगांचें चित्रीकरणहि करण्यांत येणार आहे. मुख्य भूमीपासून खडकावर जाण्या-येण्याची व्यवस्थाहि होणार आहे.

### कमी प्राप्तीच्या नौकरांना विश्रांतीची सोय

मद्रास पोर्ट ट्रस्टच्या बोर्डानें कमी पगार असलेल्या आपल्या नोकरांना विश्रांतीसाठी पाठविण्याची योजना तयार केली आहे. ज्या नोकरांना दरमहा २०० रुपयांपेक्षा कमी प्राप्ति असेल त्यांनाच ह्या योजनेचा फायदा घेतां येणार आहे. योजनेप्रमाणें ४० नोकरांच्या दोन गटांना दरसाल १५ दिवस मद्रास राज्यांतील अगर बाहेरच्या एखाद्या ठिकाणीं विश्रांतीसाठी पाठविण्यांत येईल. नौकरांच्या प्रवासखर्चापैकी व राहण्याच्या खर्चापैकी निम्मा खर्च बोर्ड करणार आहे. बाकीचा खर्च नौकरांना करावा लागेल. सध्यां ह्या योजनेचा फायदा फक्त नौकरांनाच मिळणार आहे; त्यांच्या कुटुंबीयांना मिळणार नाहीं. पण योजना यशस्वी झाल्यास ह्यासंबंधीं फेरविचार होण्याची शक्यता आहे. मद्रासच्या पोर्ट ट्रस्टमध्यें ५ हजार लोक कामावर आहेत.

### शेतीच्या उत्पादनाचे तुलनात्मक आंकडे

| | १९६१–६२ | १९६२–६३ | १९६३–६४ | १९६२–६३ च्या मानानें फरक % |
|---|---|---|---|---|
| तांदूळ (दशलक्ष टन) | ३४·८ | ३१·९ | ३६·५ | +१४·३ |
| गहूं ( ,, ) | १२·० | १०·८ | ९·७ | −१०·४ |
| इतर धान्यें ( ,, ) | २२·६ | २४·३ | २३·३ | −३·७ |
| डाळी ( ,, ) | ११·६ | ११·४ | ९·९ | −१३·७ |
| अन्नधान्यें ( ,, ) | ८१·० | ७८·४ | ७९·४ | +१·३ |
| कपास (दशलक्ष गांसड्या) | ४·५ | ५·३ | ५·४ | +२·२ |
| ताग (दशलक्ष गांसड्या) | ८·१ | ७·१ | ७·८ | +८·८ |
| ऊंस (दशलक्ष टन गूळ) | १०·१ | ९·५ | १०·३ | +७ ५ |
| तेलबिया (दशलक्ष टन) | ७·० | ७·१ | ७·१ | −०·२ |
| इंडेक्स नंबर १९४९–५० = १०० | १४१·४ | १३७·२ | १४०·५ | +२·४ |

**डार्बी लॉटरीच्या तिकिटांची विक्री**—गुजरात राज्यांत डार्बी लॉटरीच्या तिकिटांची बेकायदा विक्री करणाऱ्या एका संघटनेला भारत सरकारच्या अर्थ खात्याच्या अंमलबजावणी विभागाच्या अधिकाऱ्यांनीं उजेडांत आणलें आहे. ह्या लॉटरीचीं तिकिटें विकण्यास रिझर्व्ह बँकेनें सर्व देशभर बंदी केलेली आहे. गुजरात राज्यांत ह्या प्रकरणीं अनेक ठिकाणीं छापे घालून झडत्या घेण्यांत आल्या व दोषार्ह कागदपत्र जप्त करण्यांत आले.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.